# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### अकोला महानगरपालिका हद्दवाढ क्षेत्रातील स्वस्त धान्य दुकानांचे पुरवठा विभागाच्या शहर विभागात समायोजन करण्याबाबत

**(१) ७९१ (२४-०४-२०२५) श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिका हद्दवाढ क्षेत्रातील अठरा स्वस्त धान्य दुकानांचे समायोजन करण्याकडे पुरवठा विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे डिसेंबर,२०२४ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला महानगरपालिकेच्या हद्दवाढ क्षेत्रात शहराजवळच्या गावांचा समावेश करण्यात आला असल्याने त्या क्षेत्रातील स्वस्त धान्य दुकानांचे पुरवठा विभागाच्या शहर विभागात समायोजन होणे आवश्यक असून याबाबतचा समायोजनाचा प्रस्ताव तहसिल कार्यालय अकोला यांचेकडून जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला यांचेकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्वस्त धान्य दुकानांचे शहर विभागामध्ये समायोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (१४-०८-२०२५) :** (१) हे खरे नाही.

१८ रास्तभाव दुकाने अकोला शहरामध्ये वर्ग करण्याबाबतचा प्रस्ताव तहसिलदार, अकोला यांनी दिनांक १२/०१/२०२२ नुसार जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला यांना सादर केला होता.सदर प्रस्ताव जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला यांनी दिनांक २८/०१/२०२२ रोजी शासन मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता.

प्रस्तूत प्रस्तावाच्या तपासणीअंती आढळून आलेल्या त्रुटींची पुर्तता करुन फेरप्रस्ताव सादर करण्याबाबत शासनामार्फत दिनांक ०३/०२/२०२२ अन्वये कळविण्यात आले होते.

तद्नंतरच्या कालावधीत सदर रास्तभाव दुकानांशी संलग्न RCMS प्रणालीमधील ऑनलाईन रेशनकार्डबाबतची कामे तहसिलदार, अकोला व जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला यांचे स्तरावर सुरु होती.

(२) व (३) हे खरे नाही

तहसिलदार, अकोला यांनी रेशनकार्डशी संबंधित कामे पूर्ण करुन दिनांक १०/०३/२०२५ रोजी प्रस्ताव जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला यांचेकडे सादर केला होता.तद्नंतर जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला यांनी दिनांक ०८/०४/२०२५ रोजी समायोजनाचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला. सदरहू १८ रास्तभाव दुकाने अकोला शहरामध्ये वर्ग करण्याबाबतच्या प्रस्तावास दिनांक ११/०४/२०२५ ते दिनांक १६/०४/२०२५ या दरम्यानच्या कालावधीत शासन मान्यता देण्यात आली असून कार्यवाही पूर्ण झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासनाच्या महसूल विभागातंर्गत उपजिल्हाधिकारी पदी पदोन्नती देण्याबाबत

**(२) १४२६ (१४-०४-२०२५) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महसूल विभागांतर्गत उपजिल्हाधिकारी पदी पदोन्नती करण्यापूर्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाशी विचार विनिमय करणे तसेच पदोन्नती दिल्यानंतर ३ वर्षाने संबंधित अधिकाऱ्याच्या सेवेचे पुनर्विलोकन करणे हे उपजिल्हाधिकारी (सेवाप्रवेश, ज्येष्ठता निश्चित करणे व स्थायिकरण) नियम १९७७, पदोन्नती नियम ९(७) व नियम १२(२) अन्वये बंधनकारक असताना उपजिल्हाधिकारी पदी पदोन्नती करण्यापूर्वी लोकसेवा आयोगाशी असा कोणताही विचार विनिमय किंवा सेवेचे पुनर्विलोकन सन १९८२ पासून केले नसल्याचे महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडील मूळ अर्ज क्र ५२६/२००४ मध्ये शासनाने मान्य केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू विचार विनिमय व पदोन्नतीनंतर सेवेचे पुनर्विलोकन करण्यात येईल असे शासनाने उपरोक्त मूळ अर्ज क्र ५२६/२००४ मध्ये अर्जावरील सुनावणी दरम्यान मान्य करण्यात आले असतानाही यासंदर्भात असा कोणत्याही प्रकारचा विचार विनियम व पदोन्नती नंतरचे सेवेचे पुनर्विलोकन करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सन १९९९ पासून उपजिल्हाधिकारी पदी पदोन्नती दिलेल्या अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीबाबत लोकसेवा आयोगाशी विचार विनिमय व पदोन्नती दिल्यानंतर ३ वर्षानंतरचे संबंधित अधिकारी यांचे सेवेचे पुनर्विलोकन किती दिवसात करण्यात येणार आहे,

(४) तसेच उपजिल्हाधिकारी पदी कोणत्याही पदोन्नतीपूर्वी संबंधित अधिकारी यांचे सेवेचे पुनर्विलोकन करणेची हमी देऊन याबाबतची जबाबदारी निश्चित करुन आयोगाशी विचार विनिमय व सेवेचे पुनर्विलोकन न केलेल्या संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२६-१२-२०२५) :** (१), (२) व (३) महसूल व वन विभाग शासन परिपत्रक दिनांक ३१/१२/२०२० अन्वये प्रसिध्द केलेल्या तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्यांच्या ज्येष्ठतासूचीतील उप जिल्हाधिकारी संवर्गातील तात्पुरत्या पदोन्नत अधिकाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचे / वरिष्ठ पदाचे लाभ, उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या पदावर पदोन्नती / अपर जिल्हाधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आली असल्याने व सदर अधिकाऱ्यांना वरिष्ठ पदाचे लाभ / पदोन्नती देण्यात आले असल्याने ते पात्र होते, हे स्पष्ट होते. सबब, सदर तात्पुरत्या पदोन्नत उप जिल्हाधिकाऱ्यांचे उप जिल्हाधिकारी संवर्गात उप

जिल्हाधिकारी सेवाप्रवेश नियम १९७७ मधील नियम १२ नुसार पुनर्विलोकन झाले आहे, हे गृहीत धरुन त्यांच्या त्या संवर्गातील पदोन्नत्या कायम आहेत, असा जाणीवपूर्वक निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे उप जिल्हाधिकारी पदी पदोन्नत अधिकाऱ्यांचे नियम १२ नुसार वेगळयाने पुनर्विलोकन करण्याची आवश्यकता नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पनवेल,(जि.रायगड) येथील आदिवासी पाड्यातील कुटुंबियांना मोठ्या प्रमाणात स्थलांतरण करावे लागत असल्याबाबत

**(३) २४०१ (१०-०७-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) येथे भूमिहीन आदिवासींची संख्या मोठ्या प्रमाणात असून उदरनिर्वाहाची पुरेशी साधने उपलब्ध नसल्याने तसेच नियमितपणे रोजगार मिळत नसल्याने कामाच्या शोधात त्यांना स्थलांतर करावे लागत असल्याची बाब माहे मे, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पनवेल तालुक्यातील आदिवासी कुटूंबांचे स्थलांतरण थांबविण्याकरीता शासनामार्फत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा.डॉ. अशोक उईके (०२-०१-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) रायगड जिल्ह्यातील पनवेल हे तालुक्याचे ठिकाण असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणात औद्योगिकिकरण व शहरीकरण झालेले आहे. पनवेल तालुक्यात तळोजा येथे एमआयडीसी असून येथे मोठ्या प्रमाणात औद्योगिक कंपन्या कार्यरत असल्याने विविध प्रकारच्या रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत.
आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी समाजासाठी वैयक्तीक व सामुहिक लाभाच्या विविध योजना राबविण्यात येतात. या योजनांची अंमलबजावणी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय,पेण मार्फत करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांला मोफत अन्नधान्याच्या योजनेचा लाभ देण्यासाठी नव्याने निकष निश्चित करण्याबाबत

**(४) २८९१ (१७-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायद्यांतर्गत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाना मोफत अन्नधान्याचा पुरवठा योजनेचा लाभ मिळावा या उद्देशाने ग्रामीण व शहरी भागात नव्याने पात्रतेचे निकष निश्चित करण्याचा शासनाने घेतलेल्या निर्णयामुळे बहुतांश जनतेला सदर योजनेचा लाभ घेता येईल तसेच पात्र कुटुंबांना अनुदानित

दरात अन्नधान्य उपलब्ध होऊ शकणार असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याकरीता अन्न व नागरी पुरवठा विभागाने शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा विभागाचे नियंत्रक यांच्या अध्यक्षतेखाली सहा जणांची समिती नेमली असून उक्त समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, अहवालातील शिफारशींची स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, त्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (१६-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंब योजनेच्या ग्रामीण व शहरी लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी शासन निर्णय, दिनांक १७/१२/२०१३ अन्वये ठरविण्यात आलेल्या निकषांमध्ये बदल करून सुधारीत निकष निश्चित करण्याची बाब तपासण्याकरीता शासन निर्णय दिनांक ११/०४/२०२५ अन्वये नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर समितीचे कामकाज सुरु असून, समितीचा अहवाल अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शहर भिक्षेकरी मुक्त शहर बनविण्याबाबत

**(५) ३८४७ (१०-०७-२०२५) श्री.संदीप जोशी :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरात मोठ्या प्रमाणात महिला /लहान मुले/ मुली शहरातील प्रत्येक वर्दळीच्या चौकात भिक्षा मागत असून या भिक्षेकऱ्यांमुळे वाहनचालकांना तसेच नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले असून दिनांक १६ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान महाराष्ट्र टाईम्स, नागपूर या वृत्तपत्रात प्रकाशित बातमीनुसार मध्यप्रदेशातील इंदोर शहर हे भिक्षेकरी मुक्त शहर घोषित झाले असल्याचे निदर्शनास आले असून याच धर्तीवर नागपूर शहर भिक्षेकरी मुक्त करण्याची मागणी शहरातील नागरिकांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर शहर भिक्षेकरी मुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (२४-१२-२०२५) :** (१) नाही, हे खरे नाही.
शासनास अशाप्रकारचे कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.
(२) भिक्षेकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी नागपूर शहरामध्ये महिला व बालविकास विभागाअंतर्गत शासकीय पुरुष भिक्षेकरी स्विकार केंद्र व शासकीय महिला भिक्षेकरी स्विकार केंद्र असून महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंध अधिनियम, १९५९ अन्वये पोलीस विभागाच्या सामाजिक सुरक्षा विभाग (गुन्हे शाखा) व महिला व

बालविकास विभाग यांच्या समन्वयाने संयुक्तरित्या नागपूर शहरात भिक्षेकरी पकड मोहिम नियमित राबविण्यात येते व पकड मोहिमेमध्ये आढळून येणाऱ्या भिक्षेकऱ्यांना सदर स्विकार केंद्रात दाखल करण्यात येते. नागपूर शहरामध्ये पोलीस आयुक्त, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली "मिशन मुक्ती" या नावाने मोहिम राबविण्यात येते. यामध्ये नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून स्वयंसेवी संस्थेमार्फत चालू असलेल्या चालू असलेल्या ६ बेघर निवारा केंद्रात दाखल करण्यात येते. तसेच नागपूर महानगरपालिकेमार्फत SMILE (Support for marginalized Indivisuals for Livelihood and Enterprise) हा प्रकल्प आस्था भिक्षेकरी निवारागृह, मोक्षधाम रोड, कॉटन मार्केट, नागपूर येथे सुरु आहे. अशा प्रकारे पुनर्वसनासाठी अन्न, वस्त्र, निवारा, व्यावसायिक प्रशिक्षण, समुपदेशन, वैद्यकीय उपचार मोफत उपलब्ध करुन देण्यात येतात व त्यांचे पुनर्वसन करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील वनहक्क पट्टे वाटपाच्या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार व अनियमितता होत असल्याबाबत

**(६) ४२१८ (१७-०७-२०२५) श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर ग्रामीण तालुक्यात "अनुसूचित जमाती आणि इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६" अंतर्गत आदिवासी व इतर वननिवासी लाभार्थ्यांना वनहक्क पट्टे वाटप करताना महसूल व वन विभागातील संबंधित अधिकाऱ्यांनी संगनमत करून बनावट कागदपत्रांच्या आधारे कोट्यवधी रुपयांच्या किमतीत शासकीय जमिनींचे वाटप केल्यामुळे मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार व अनियमितता झाल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मागील तीन आर्थिक वर्षांमध्ये (सन २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५) राज्यातील इतर भागांमध्ये देखील वनहक्क पट्टे वाटप प्रक्रियेमध्ये अशा प्रकारचे गैरव्यवहार अथवा अनियमितता झाल्याबाबत शासनास तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वनहक्क पट्टे वाटपाच्या प्रक्रियेत गैरव्यवहार व अनियमितता टाळण्याकरीता तसेच वनहक्क पट्टे वाटप प्रक्रिया अधिक पारदर्शक करून पात्र लाभार्थ्यांना वनहक्क पट्टे मिळण्याकरीता कोणती कार्यवाही केली तसेच दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (०२-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) वनहक्क कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय समित्यांना वेळोवेळी निर्देश देण्यात येतात.तसेच मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय संनियंत्रण समितीमार्फत वेळोवेळी आढावा घेण्यात येतो. वनहक्क दाव्यांची प्रक्रिया सुलभ,जलद व पारदर्शक करण्यासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत "आदिवन मित्र प्रणाली" विकसित करण्यात आली आहे.

नागपुर येथील अनियमितते प्रकरणी वनहक्क प्रकरणे हाताळणाऱ्या संबंधित ३ महसूल सहायकांना निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील नवजात बालकांमधील अत्यंत दुर्धर आजारावर उपाययोजना करणेबाबत

**(७) ४४६५ (१५-०७-२०२५) श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील काही नवजात बालके ही Spinal Muscular Astrophy (SMA) Type-१ (पाठीच्या कण्याची स्नायूंची दुर्बलता) या अत्यंत दुर्धर आजाराने ग्रस्त असल्याचे व सदर बालकांसाठी आवश्यक असलेल्या "Zolgensma" या जनुकीय थेरपीसाठी राज्य शासनाकडे वारंवार अनेक सामाजिक संस्थांनी विनंती करूनही शासन व आरोग्य प्रशासनाकडून याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातारा येथील पारस बागल या बालकाला देखील हा आजार झाला असून त्यांच्या कुटुंबाकडून तसेच काही सामाजिक संस्थांकडून या बालकाची क्लीनिकल एनरोलमेंट प्रक्रिया नोंदणी करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत परंतु सदर नोंदणी होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दुर्धर आजाराग्रस्त रुग्णांना जनुकीय थेरपी उपलब्ध होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (२३-१२-२०२५) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

नागरीक/लोकप्रतिनिधी यांचेकडून निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत. तथापि, Spinal Muscular Astrophy (SMA) Type-१ (पाठीच्या कण्याची स्नायूंची दुर्बलता) हा आजार दुर्मिळ असून यास लागणारी जनुकीय थेरपी ही सुपर स्पेशालिस्ट उपचार पध्दतीमध्ये मोडते. ही उपचार पध्दती Special New Born Care Unit (SNCU) मध्ये देणेबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेमध्ये समाविष्ट नाही. तसेच सदर थेरपी SNCU मध्ये देण्याकरीता अर्हता धारक कर्मचारी उपलब्ध नाहीत.यास्तव सद्य:स्थितीत ही उपचार पध्दती SNCU मध्ये देण्यात येत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण बदलापूर (जि.ठाणे) दरम्यानच्या तिसऱ्या व चौथ्या रेल्वे मार्गिकेच्या जमीन भूसंपादनात अनियमितता झाल्याबाबत

**(८) ४६३३ (२३-०९-२०२५) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण- बदलापूर (जि.ठाणे) दरम्यानच्या तिसऱ्या व चौथ्या रेल्वे मार्गिकेच्या जमीन भूसंपादनात अनियमितता झाल्याने उपविभागीय अधिकाऱ्यांनी संबंधित खातेदाराला पंधरा दिवसात ही रक्कम शासनाच्या खात्यात जमा करण्याबाबतचे निदेश दिले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपविभागीय अधिकाऱ्यांनी संबंधित खातेदाराला पंधरा दिवसात ही रक्कम शासनाच्या खात्यात जमा करण्याबाबतच्या दिलेल्या निदेशानुसार सदर प्रकरणाचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे,

हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने कल्याण- बदलापूर (जि.ठाणे) दरम्यानच्या तिसऱ्या व चौथ्या रेल्वे मार्गिकेच्या जमीन भूसंपादनात झालेल्या अनियमितेच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०९-०१-२०२६) :** (१), (२) व (३) कल्याण- बदलापूर (जि.ठाणे) दरम्यानच्या तिसऱ्या व चौथ्या रेल्वे मार्गिकेसाठी जमीन भूसंपादनासाठी केलेल्या संयुक्त मोजणीमध्ये स.न.४९/२/ब ही मिळकत बाधित होत असल्याचा अहवाल उप अधीक्षक, भूमी अभिलेख, उल्हासनगर यांनी सादर केला होता.त्याप्रमाणे उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर तथा भूसंपादन अधिकारी यांनी निवाडा पारित करुन रक्कम ७/१२ सदरी मालकास अदा करण्यात आली होती. तद्नंतर स्वानंद अर्णव को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीच्या तक्रारीच्या अनुषंगाने फेर संयुक्त मोजणी केली असता ४९/२/अ हा गट बाधित होत असल्याचे निदर्शनास आल्याने ४९/२/ब च्या जमीन मालकांना अदा करण्यात आलेली निवाडा रक्कम वसूलीसाठी उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांनी आदेश पारित केले. तसेच, संयुक्त मोजणी मध्ये झालेल्या त्रुटीच्या अनुषंगाने उप अधीक्षक, भूमी अभिलेख, उल्हासनगर यांचा खुलासा मागविण्यात आला असून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील राज्य कामगार विमा योजना रुग्णालयातअनेक पदे रिक्त असल्याबाबत

**(९) ४९५५ (१७-११-२०२०) श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील राज्य कामगार वीमा योजना रुग्णालयात तज्ञांची, पॅथालॉजीस्ट व एक्स-रे विशेषज्ञांची अनेक पदे रिक्त असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपचाराकरीता आलेल्या रूग्णांना शासकीय किंवा खाजगी रुग्णालयात पाठवुन त्यांचे निदान करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रुग्णालयात तज्ञांची, पॅथालॉजीस्ट व एक्स-रे विशेषज्ञांची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (२४-१२-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
नागपूर राकावियो रूग्णालयातील उपलब्ध विशेषज्ञांकडून विमाधारक रुग्णांवर उपचार पुरविण्यात येत असून, ज्या आजारांवर सदर रुग्णालयामध्ये उपचाराची सुविधा उपलब्ध नाही, अशा विमारुग्णांना शासकीय किंवा टाय-अप करण्यात आलेल्या खाजगी रूग्णालयांमार्फत उपचाराची सुविधा उपलब्ध करुन त्या खर्चाची प्रतिपूर्ती राकावि महामंडळामार्फत करण्यात येते.

(३) राकावियो रूग्णालय नागपूर येथे विशेषज्ञांची एकूण १३ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ०५ पदे भरलेली असून ०८ पदे रिक्त आहेत. सदर ०८ रिक्त पदांवर कंत्राटी पध्दतीने १ वर्षाच्या कालावधीकरीता अंशकालीन विशेषज्ञांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तसेच सदर रूग्णालयात निवासी बधिरीकरण शास्त्रज्ञ व निवासी क्ष-किरण शास्त्रज्ञ यांची ०२ पदे मंजूर असून सदरील दोन्ही पदे रिक्त असल्याने कंत्राटी पध्दतीने १ वर्षाच्या कालावधीकरीता ०२ डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त राकावि महामंडळाच्या मानका नुसार अतिरिक्त अनुज्ञेय असलेले ०८ विशेषज्ञ व १५ वैद्यकीय अधिकारी यांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्यात आलेली आहे. याचबरोबर नविन स्थापित झालेल्या अतिदक्षता कक्षा आवश्यक पदांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्यात आलेली आहे.

तसेच, शासन निर्णय दिनांक ०८/०७/२०२५ अन्वये सदर रुग्णालयाकरीता १३ वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यापैकी ११ वैद्यकीय अधिकारी रुजू झाले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गणेशपेठ, नागपूर येथील बस स्थानकाची दुरवस्था झाल्याबाबत

**(१०) ९१५७ (१५-०७-२०२१) श्री.प्रविण दरेकर, अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गणेशपेठ, नागपूर येथील बस स्थानकाची नियोजनाअभावी दुरवस्था झाल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गणेशपेठ बसस्थानकावर दररोज हजारो प्रवासी ये-जा करीत असून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना योग्यत्या सोयी सुविधा उपलब्ध होत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्य परिवहन महामंडळाच्या झालेल्या दुरवस्थेबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (११-१०-२०२१) :** (१), (२) व (३) गणेशपेठ बसस्थानकांवर प्रवाशांना आवश्यक असलेल्या सर्व मूलभूत सोयी सुविधा उदा. पिण्याचे पाणी, प्रसाधनगृह, आसन व्यवस्थेसह प्रतिक्षालय, लाईट, पंखे, अंपगासाठी प्रसाधनगृह, तिकिट आरक्षण कक्ष, चौकशी कक्ष, हिरकणी कक्ष, उपहारगृह, वाहनतळ इ. त्याचप्रमाणे आगाराच्या देखरेखेखाली बसस्थानकाची दैनंदिन साफसफाई केली जात असून, वाहतूकीचे योग्य नियोजन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एम (पूर्व) विभागात पंडीत दिनदयाळ उपाध्याय क्रिडांगणाच्या सौंदर्यीकरणाच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(११) ११००१ (२०-११-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या पूर्व उपनगरातील महानगरपालिकेच्या एम (पूर्व) विभागात पंडीत दिनदयाळ उपाध्याय क्रिडांगणाच्या सौंदर्यीकरण, सुरक्षा, झाडे लागवड, निगा, स्वच्छता या कामांसाठी महानगरपालिकेने लाखो रुपये खर्च केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंत्राटदाराने मात्र कोणतेही काम न करता लाखो रुपयांची देयकांची उचल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीनूसार या कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच या क्रिडांगणाच्या दर्जेदार विकासासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०९-२०२५) : (**१) हे खरे आहे.

पंडित दिनदयाळ उपाध्याय मैदानाचे सौदर्यीकरण (झाडे झुडपे लावणे, प्रवेशद्वार बसविणे, बाक व कचराकुंडी बसविणे, नामफलक व सूचना फलक बसविणे) व परिरक्षण करणे याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एम/पूर्व विभागात कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली होती.
(२) हे खरे नाही.
(३) महानगरपालिकेच्या स्तरावर सदर मैदानात झालेल्या कामाच्या पाहणीदरम्यान वेळोवेळी आढळून आलेल्या त्रुटींसाठी कंत्राटदारास बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत रुपये ४,२६,९६६/- इतका दंड आकारुन तो वसूल करण्यात आला आहे. तसेच, महानगरपालिकेच्या दक्षता विभागामार्फत करण्यात आलेल्या तपासणीदरम्यान आढळून आलेल्या त्रुटीप्रमाणे रुपये ४०,०००/- इतका दंड आकारण्यात आलेला आहे. काही ठिकाणी झाडे-झुडपे, वृक्ष आढळून न आल्याबाबत रुपये १,३७,०९८/- इतकी रक्कम कंत्राटदाराच्या देयकामधून कपात करण्यात आली आहे. तसेच, कंत्राटदाराने माहे एप्रिल, २०२० ते सप्टेंबर, २०२० या कोविड-१९ कालावधीमध्ये परिरक्षणाचे काम न केल्यामुळे त्यास सदर कालावधीचे देयक देण्यात आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## म्हाडा भवन इमारतीच्या दुरुस्तीच्या कामाबाबत

**(१२) ११४९६ (२०-११-२०२१) श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रिय विकास महामंडळाचे (म्हाडा) वांद्रे,मुंबई येथील म्हाडा भवन इमारती बांधकामाचे स्ट्रक्चरल ऑडीट सन २०१२-१३ मध्ये करण्यात येऊन त्या अहवालानुसार सन २०१४ मध्ये दुरुस्तीच्या कामासाठी १० कोटी रुपये रक्कमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दुरुस्तीचे काम सन २०१६ मध्ये पूर्ण होऊन त्या कामाचे म्हाडा प्रशासनाने कंत्राटदारास ७ कोटी ६५ लक्ष रुपये अदा केले असल्याचे तसेच सदर दुरुस्तीचे काम समाधानकारक असल्याचा अहवाल आयआयटीने दिला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास दिनांक १६ सप्टेंबर,२०१७ रोजी वा त्या सुमारास म्हाडा भवनाच्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी

३६ कोटी रुपयांची, पुन्हा सुधारीत प्रशासकीय मान्यता (सुप्रमा) देण्यात आल्यावर दिनांक २४ जानेवारी, २०१९ रोजी वा त्या सुमारास ई-निविदाच्या माध्यमातून कामाला मंजुरी देण्यात येऊन संबंधित कंत्राटदारास २१ कोटी ७९ लाख रुपये इतकी रक्कम अदा करण्यात आली अ ाली व त्यानंतरही म्हाडा भवन इमारतीत पावसामुळे गळती सुरु असल्याचे दिनांक २८ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मागील दोन्ही वेळी केलेल्या इमारत दुरुस्ती कामाचे आयआयटीकडून स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले असून आयआयटीने दुरुस्तीचे काम समाधानकारक असल्याचे अहवाल देऊनही पावसाळयात इमारतीमध्ये गळती होण्यामागील कारणे काय आहेत,
(५) असल्यास,उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०१-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे. म्हाडा भवन इमारतीच्या संरचनात्मक दुरूस्तीकरीता (Structural Repair Work) सन २०१४ मध्ये रुपये १०.८६ कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली. तसेच रुपये ७.६५ कोटी रकमेची निविदा काढून कामे सन २०१८ मध्ये (प्रथम टप्पा) पूर्ण करण्यात आली. (सदरहू कामात इमारतीचा अंशतः भाग समाविष्ट होता).
(३), (४), (५) व (६) संपूर्ण म्हाडा भवन इमारतीची संरचनात्मक दुरूस्तीची कामे एकाचवेळी पूर्ण करता येणे शक्य नसल्याने, संरचनात्मक दुरूस्तीकरीता दिनांक १६/११/२०१७ रोजी रुपये ३६.१७ कोटी रकमेची सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली. दिनांक २४/०१/२०१९ रोजी रुपये १४.०७ कोटी रकमेची निविदा काढून दुरूस्तीची कामे करण्यात आली. इमारतीच्या संरचनात्मक दुरूस्तीवर आतापर्यंत एकूण रुपये २६.०५ कोटी खर्च झाला आहे.

दिनांक २८ जून २०२१ रोजी म्हाडा भवन इमारतीत पावसामुळे झालेली गळती संरचनात्मक (स्ट्रक्चरल) दुरूस्ती केलेल्या कामाच्या भागातून झालेली नसून इमारतीच्या चौथ्या माळयाच्या सिमेंट पत्र्याच्या छतातून झाली आहे.

---

## राज्यात पर्यटन विकासातून रोजगार निर्मिती करण्याकरीता पर्यटन स्थळांना सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१३) १२५४३ (३०-०३-२०२२) श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जंगले, पुरातन गडकिल्ले, गुंफा, मंदिरे, समुद्रकिनारे, वन्यजीव असे पर्यटन वैविध्य असून ते जगभरापर्यंत पोहचविण्यासाठी शासनाने उपक्रम हाती घेतले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू उपक्रमामुळे देशातील व जगातील पर्यटक महाराष्ट्राकडे आकर्षित होतील त्यामुळे राज्याचा पर्यटन विकास होवून रोजगार निर्मिती आणि अर्थव्यवस्थेला गती मिळेल, याकरीता शासन विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील पर्यटन स्थळांची माहिती घेऊन तेथे पर्यटकांना आवश्यक व दर्जेदार सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई (२६-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) पर्यटन विभागामार्फत दरवर्षी वार्षिक पणन व ब्रॅंडिग मोहिमेंतर्गत राज्यातील पर्यटन स्थळांची देश विदेशात प्रसिध्दी करुन देश-विदेशातील पर्यटकांना आकर्षित केले जाते. प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत राज्यातील पर्यटन स्थळांच्या ठिकाणी मूलभूत सुविधांची निर्मिती केली जाते. त्यानुसार पर्यटकांसाठी दर्जेदार सुविधा पुरविण्यात येत आहेत. तसेच, पर्यटन धोरण २०२४ च्या माध्यमातून पात्र पर्यटन प्रकल्पांना वित्तीय व गैरवित्तीय प्रोत्साहने उपलब्ध करुन दिले जात असल्याने याद्वारे रोजगार निर्मिती व राज्याच्या अर्थव्यवस्थेला गती मिळत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात भेसळयुक्त मुखवास आणि तत्सम पदार्थाची विक्री करणाऱ्यांवर केलेल्या कारवाईचा तपशील देण्याबाबत

**(१४) १४२५२ (२५-०८-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात भेसळयुक्त मुखवास आणि तत्सम पदार्थाची विक्री करणाऱ्यांवर मागील सहा महिन्यात काय कारवाई केली याचा तपशील सादर करण्याचे आदेश न्यायालयाने अन्न व औषध प्रशासन आयुक्तांना माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.न्यायालयाच्या आदेशानुसार कारवाईचा तपशील सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे, तसेच, अद्यापपर्यंत किती विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ (२०-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) मा.न्यायालयाच्या आदेशानुसार कारवाईचा तपशिल सादर करण्यात आला आहे.

राज्यात भेसळयुक्त मुखवास आणि तत्सम पदार्थाचे अनुषंगाने दिनांक ०१/१०/२०२१ ते दिनांक ३१/०३/२०२२ पर्यंत एकूण ३० आस्थापनांवर कारवाई करण्यात आली असून एकूण ५० मुखवास आणि तत्सम पदार्थाचे अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले आहेत. त्यापैकी २४ अन्न नमुने प्रमाणित घोषित झाले असून, ०५ कमी प्रतीचे व १४ असुरक्षित घोषित झाले असून ०७ नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत. एकूण ०५ कमी दर्जाच्या नमुन्यांपैकी ०३ प्रकरणी न्यायनिर्णय अधिकारी यांचेकडे न्यायनिर्णय प्रकरण दाखल केले असून, उर्वरीत ०२ प्रकरणी न्यायनिर्णय दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. १४ असुरक्षित अन्न नमुन्यांपैकी ०१ प्रकरणी मा.न्यायालयात खटला दाखल केला असून उर्वरित १३ प्रकरणी मा.न्यायालयात खटला दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच दिनांक ०१/०४/२०२२ ते दिनांक

०३/०६/२०२२ पर्यंत एकूण ४६ आस्थापनांवर कारवाई घेण्यात आली असून, एकूण ६६ मुखवास आणि तत्सम पदार्थांचे अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले आहेत. त्यापैकी ०९ अन्न नमुने प्रमाणित घोषित झाले असून ५७ अन्न नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील सांडपाणी वाहून नेणाऱ्या १०० वर्षे जुन्या वाहिन्यांच्या पुनर्निर्माण प्रकल्पाच्या कामासाठी जिओपोलीमर लायनिंग तंत्रज्ञानाचा वापर करण्याबाबत

**(१५) १८७९८ (०१-०३-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील सांडपाणी वाहून नेणाऱ्या १०० वर्षे जुन्या वाहिन्यांच्या पुनर्निर्माण प्रकल्पाच्या कामासाठी जिओपोलीमर लायनिंग तंत्रज्ञानाचा वापर करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका आग्रही असल्याची बाब दिनांक ३ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कामासाठी यापूर्वी काढलेल्या निविदेत मशीन वुंड स्पायरल लायनिंग तंत्रज्ञानाचा वापर करण्याबाबत आग्रह धरण्यात आला होता, हे हि खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू कामासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून वापरण्यात येणारे जिओपोलीमर लायनिंग तंत्रज्ञान जगभरात कुठेही यशस्वी ठरले नाही, हे हि खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनास मुंबईतील सांडपाणी वाहून नेणाऱ्या १०० वर्षे जुन्या वाहिन्यांच्या पुनर्निर्माण प्रकल्पाच्या कामासाठी जिओपोलीमर लायनिंग तंत्रज्ञानाचा वापर करण्यामागचा हेतू काय आहे आणि याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका पर्जन्य जलवाहिनी विभागाने मुंबईतील सांडपाणी वाहून नेणाऱ्या १०० वर्षे जुन्या वाहिन्यांच्या पुननिर्माण प्रकल्पाच्या कामासाठी आय.आय.टी मुंबई मधील तज्ञ प्रोफेसर यांचा समावेश असलेल्या तांत्रिक सल्लगार समितीच्या दिनांक २३-११-२०२२ रोजीच्या सल्ल्यानुसार जिओपोलिमर लायनिंग तंत्रज्ञान वापरण्याचा निर्णय घेण्यात आला.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शहर विभागामध्ये १०० वर्षे जुन्या ब्रिटिशकालीन कमानी आकाराच्या जीर्ण जलवाहिण्याचे मजबुतीकरण/ पुनर्स्थापना करण्यासाठी करणे,दाट लोकवस्ती व तीव्र वाहतुकीची घनता इत्यादी मर्यादा विचारात घेऊन तांत्रिक सल्लागार समितीने सुचविलेल्या खोदकाम विरहीत तंत्रज्ञानाचा वापर करुन जुन्या पर्जन्य जलवाहिनीचे पुनर्स्थापना करणे आणि आयुष्यमान वाढविणे यासाठी जिओपोलीमर तंत्रज्ञान वापरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील २ हजार २०० कोटी रुपयांचा "मालमत्ता कर" थकीत असल्याबाबत

**(१६) १९१३५ (०८-०८-२०२३) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेत गत १० ते १२ वर्षात मालमत्ता कर न भरणारी ३ हजार ९४५ प्रकरणे असल्याचे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांच्याकडून एकूण २ हजार २३७ कोटी रुपये मालमत्ता कर येणे बाकी असून आतापर्यंत किती कर वसूल करण्यात आला आहे,

(३) असल्यास, थकीत मालमत्ता कर तातडीने वसूल करण्याबाबात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०९-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संगणकीय प्रणालीत उपलब्ध माहितीनुसार, एकूण रुपये २४५९.४८ कोटी इतका मालमत्ता कर येणे बाकी होते, त्यापैकी माहे ऑगस्ट, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात रुपये ०.०७ कोटी इतका मालमत्ता कर वसूल करण्यात आला आहे.

(३) मा.उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्रमांक २५९२/२०१३ च्या अंतरिम आदेशानुसार बहुतांशी करदाते मागणीच्या ५०% रकमेचे अधिदार करीत आहेत. त्यामुळे मालमत्ता कराची मोठ्या प्रमाणावर थकबाकी असल्याचे दिसून येते.

तथापि, जास्तीत जास्त थकीत मालमत्ता कर वसुली करण्यासाठी प्राधान्यक्रम ठरवून त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत युध्दपातळीवर कार्यवाहीचा आराखडा ठरविण्यात आला असून, मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम २०२ ते २०६ च्या तरतुदींचा अवलंब करण्याबाबत विभाग स्तरावर आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार थकबाकीदार असलेल्या मालमत्ताधारकांवर खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे:-• ८६८ मालमत्ताधारकांची जलजोडणी खंडीत करण्यात आली आहे.

• ३०७७ अचल मालमत्तांची अटकावणी करण्यात आली आहे.

• कोणत्याही अचल मालमत्तेची जप्ती अथवा लिलाव करण्यात आलेला नाही.

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम २०२ च्या तरतुदीनुसार थकबाकीदारांवर थकीत मालमत्ताकराच्या देय दिनांकापासून २% प्रतिमाह या दराने संगणकीय प्रणालीद्वारे दंड आकारणी करण्यात येते. तसेच परिमंडळ स्तरावर वसुली कक्ष स्थापन करण्यात येऊन मालमत्ता कराची वसुली प्रभावीपणे होण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न करण्यात येतात.

भांडवली मुल्याधारित कर प्रणालीमध्ये मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम २०६ च्या तरतुदीनुसार थकीत मालमत्ताकराच्या वसुलीसाठी स्थावर मालमत्तांचा लिलाव करण्याबाबतच्या विनियमात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार जाहीर लिलावाद्वारे अचल मालमत्तांची विक्री करण्याबाबतची कार्यवाही विभाग पातळीवर सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात मराठी चित्रपटांना प्राधान्याने चित्रपटगृहे उपलब्ध करून देण्याबाबत

**(१७) २१०९३ (०३-०१-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठी चित्रपटांना चित्रपटगृह मिळविण्यासाठी अत्यंत संघर्ष करावा लागत असल्याची बाब दिनांक ९ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात मराठी चित्रपटांना चित्रपटगृहे मिळत नसल्याने चित्रपट निर्मात्यांना नाहक आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि राज्यात मराठी चित्रपटांना प्राधान्याने चित्रपटगृहे उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१०-१२-२०२५) :** (१), (२) व (३) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

तथापि, शासनाच्या दिनांक ०६/०३/१९६८ रोजीच्या आदेशान्वये व दिनांक १४/०६/२००२ रोजीच्या परिपत्रकान्वये चित्रपटगृहात वर्षातून किमान ४ आठवडे मराठी चित्रपट प्रदर्शित करण्यासाठी राखून ठेवावे अशा सूचना दिलेल्या आहेत. सदर बाब चित्रपटगृहाच्या परवान्याचे नूतनीकरण करताना तपासण्याची जबाबदारी परवाना प्राधिकारी यांची असल्याचे देखील कळविण्यात आले आहे. तसेच, चित्रपटगृहात मराठी चित्रपट प्रदर्शित करण्यास काही अडचणी उद्भवल्यास अशा अडचणींचे निराकरण करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना देखील देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई (जि.पालघर) तालुक्यातील शिरवली सेवा सोसायटीच्या गोदामाचे भाडे आदिवासी विकास महामंडळाने थकविले असल्याबाबत

**(१८) २१७८७ (०३-०१-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यातील शिरवली सेवा सोसायटीच्या गोदामाचे भाडे आदिवासी विकास महामंडळाने मागील आठ वर्षांपासून अदा न केल्याने सदर सेवा सोसायटी आर्थिक अडचणीत आली असल्याची तसेच पुढील वर्षी भात खरेदी केंद्रासाठी गोदाम भाड्याने द्यायचे की नाही ही समस्या सोसायटी सेवा संचालकांपुढे निर्माण झाली असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी महामंडळाने शिरवली सेवा सोसायटीचे सर्व थकीत भाडे देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (०१-०१-२०२६) :** (१), (२) महामंडळाकडून गोदाम भाड्याने घेतेवेळी गोदाम मालकाचे मागणीपत्र, गोदाम मालकाचे हमीपत्र गोदाम मालकासोबत करारनामा या दस्तऐवजांची आवश्यकता असते. दिनांक १९/०९/२०१९ च्या शासन निर्णयानुसार धान साठवणूक करणेकामी भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या गोदामांचे भाडे केंद्र शासनाने दर वर्षीच्या कॉस्टलिस्ट मध्ये ठरवून दिलेल्या कालावधी पर्यंतच्या खर्च मान्य करुन अदा करावयाची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने मध्यवर्ती गोदाम शिरवली येथे खरेदी केलेला धान साठवणूक केलेला असून हंगाम २०१६-१७, २०१७-१८ व २०२०-२१ चे गोदाम भाडे देयक उप प्रादेशिक कार्यालय, मनोर यांचेमार्फत प्रादेशिक कार्यालय, जव्हार येथे सादर करण्यात आलेली होती. सदर बिलांच्या दस्तऐवजांची तपासणी केली असता त्रुटी आढळून आल्याने त्रुटींची पुर्तता करुन फेर सादर करणेकरीता संबंधीतांस परत करण्यात आलेली आहे. तसेच हंगाम २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१ व २०२३-२४ मध्ये गोदामभाडे करारनामा करणेकामी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ यांच्या दिनांक ३१/०३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सदर सोसायटीचे सचिव यांना कळवून देखील करारनामा करणेकरीता आवश्यक दस्तऐवज सादर केलेले नाहीत. तसेच, गोदाम भाडे करीता आवश्यक असणारे साठा रजिस्टर अद्याप पर्यंत उप प्रादेशिक कार्यालय, मनोर येथे सादर केले नाही. त्रुटींची पुर्तता करण्यात आल्यानंतर पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तीर्थक्षेत्र दर्शन योजनेचे स्वरुप निश्चित करुन अंमलबजावणी करण्याबाबत

**(१९) २४७२० (२०-०४-२०१७) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ६० वर्षावरील जेष्ठ नागरीकास एकदा देशातील कुठल्याही एका तीर्थक्षेत्राचे दर्शन घेण्यासाठी शासकीय खर्चाने तीर्थयात्रेला नेण्याची योजना मुख्यमंत्री तीर्थक्षेत्र दर्शन योजनेंतर्गत सुरु करण्यात येणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजना केव्हा सुरू करणार आहे, या योजनेचे स्वरुप निश्चित करुन त्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई (०४-१२-२०२५) :** (१) व (२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय दिनांक १४/०७/२०२४ अन्वये महाराष्ट्र राज्यातील सर्व धर्मियांमधील वय वर्षे ६० व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना तीर्थ दर्शन यात्रेची मोफत संधी देण्यासाठी "मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना" राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य कामगार विमा योजनेंतर्गत तात्पुरत्या स्वरूपातील परिचारीकांना कायम करणेबाबत

**(२०) ३८४९६ (०४-०४-२०१८) श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ३५४११ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य कामगार विमा योजनेच्या महात्मा गांधी मेमोरियल नर्सिंग स्कुल मधून उत्तीर्ण झालेल्या १२१ परिचारीका मागील २ ते ९ वर्षापासून तात्पुरत्या स्वरूपात विमा कामगार योजनेत कार्यरत आहेत, परंतु आयुक्त कार्यालय (कामगार विमा योजना) किंवा शासनाने त्यांना अद्यापपर्यंत कायम करण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिचारीकांना कायम करण्याऐवजी आयुक्त कार्यालयाने माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान नवीन भरती प्रक्रिया सुरू केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी आयुक्त, राज्य कामगार विमा व मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्यास्तरावरून कोणती कार्यवाही व उपाययोजना करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (२४-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

राज्य कामगार विमा योजनेअंतर्गत दिनांक १५/०४/२०१५ च्या शासन अधिसुचने नुसार कंत्राटी तत्वावर नियुक्त झालेल्या ज्या परिचारिकांची बंधपत्रित सेवा दिनांक १५/०४/२०१५ पर्यंत पूर्ण झालेली आहे, अशा महात्मा गांधी मेमोरियल नर्सिंग स्कुल मधून उत्तीर्ण झालेल्या व विशेष लेखी परिक्षेस पात्र ठरलेल्या ७४ परिचारिकांची विशेष लेखी परीक्षा घेऊन त्यामध्ये उत्तीर्ण झालेल्या ७४ परिचारिकांना दिनांक २३/०६/२०२० च्या आदेशान्वये सेवेत नियमित करण्यात आलेले आहे. तर १८ कंत्राटी परिचारिकांना दिनांक १५/०४/२०१५ च्या शासन अधिसुचनेनुसार पात्र ठरत नसल्याने त्यांना सेवेत कायम/ नियमित करण्यात आलेले नाही. तर उर्वरीत २९ परिचारीका योजनेअंतर्गत कार्यरत नसल्याने त्यांना कायम करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(२) अंशत: खरे आहे.

दिनांक १५/०४/२०१५ च्या शासन अधिसुचनेनुसार ७४ पात्र परिचारीकांना कायम करण्यात आलेले आहे.

तसेच सदर अधिसूचनेनुसार सन २०१७ मध्ये महाऑनलाईन मार्फत राकावि योजनेंतर्गत परिचारिकांची एकूण ४१६ पदे सरळसेवेने भरण्यात आली आहेत.
(३) राज्य कामगार विमा योजनेअंतर्गत कंत्राटी तत्वावर नियुक्त झालेल्या ७४ परिचारिकांना दिनांक १५/०४/२०१५ च्या शासन अधिसुचने नुसार कायम / नियमित करण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. विलास आठवले**
**मुंबई.** **सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.